आरे दुग्धविज्ञान संस्थेचे नाव बदलून "पंडित दिनदयाळ उपाध्याय, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे" असे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः एएमसी-२०१७/प्र.क्र.८७/पदुम-१०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०६ मार्च, २०१८

वाचा :-

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे पत्र क्र. आदुवि-३ / नावात बदल/ दुविस, आरे / प्र. क्र . ३०/२०१७/ दि .२२/०५/२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना दुग्धव्यवसायाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळावे यासाठी युनिसेफच्या चिल्ड्रेन प्लॅन अंतर्गत मशिनरी पुरविण्यात येऊन सन १९६० साली इंडियन डेअरी डिप्लोमा कोर्स (सध्याचे नाव दुग्धतंत्रशास्त्र पदविका अभ्यासक्रम) दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे येथे सुरु करण्यात आला. भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अगदी सुरुवातीला सुरु करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांपैकी दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे ही एक संस्था आहे.

न्युझिलंड सरकारच्या कोलंबो प्लॅन अंतर्गत मिळालेल्या आर्थिक मदतीने विद्यार्थ्यांना व प्रशिक्षणार्थींना राहण्यासाठी न्युझिलंड वसतीगृहाची निर्मीतीदेखील करण्यात आली.

सदर संस्थेमध्ये पदविका अभ्यासक्रम २ वर्षाचा असून प्रथम व व्दीतीय वर्षाची प्रवेश क्षमता ४० विद्यार्थी आहे. सुरुवातीला या संस्थेमध्ये अभ्यासक्रम ICAR BOARD (Indian council of Agriculture Research) कर्नाल, हरियाणा यांचे मान्यतेने सुरु करण्यात आलेला होता व सदर अभ्याक्रमाची परिक्षा त्यांचेमार्फत घेण्यात येत होती.

सदर अभ्यासक्रम सन १९८५ नंतर तंत्रशिक्षण मंडळ, व सन १९९१ नंतर कोकण कृषि विद्यापीठ, दापोली त्यानंतर सन २००१ पासून ते आजतागायत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्या अधिपत्याखाली असून अभ्यासक्रम गठीत करण्याची व पदविका प्रदान करण्याची जबाबदारी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांची आहे. सदर संस्थेचे प्रशासकीय व्यवस्थापन दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अंतर्गत आहे.

मा.मंत्री (पदुम) व सचिव (पदुम) यांच्या समवेत दिनांक ११/०५/२०१७ रोजी आयोजित कराण्यात आलेल्या बैठकीत **दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे** या संस्थेचे नाव बदलून "**पंडीत दिनदयाळ उपाध्याय, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे**" असे करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयाच्या अनुषंगाने उक्त संस्थेचे नाव बदलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

शासन या शासन निर्णयाद्वारे **दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे** या संस्थेचे नाव बदलून "**पंडीत दिनदयाळ उपाध्याय, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे**" असे करण्याचा निर्णय घेत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१७१६४८८६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2018.03.06 17:18:20 +05'30'

(अशोक उईके)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (पदुम), महाराष्ट्र राज्य
४. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
५. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्धवसाहत, गोरेगाव (पू.), मुंबई
७. निवड नस्ती, पदुम-१०.